दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | रविवार दि.१० मे २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २४८ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Sunday 10 May 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 248 | Pages 4 | Rate 4 Rs

### मुंबईकरांसाठी आदित्य ठाकरेंचे फडणवीसांना पत्र

**मुंबई**–मुंबईतील सेस आणि नॉन सेस इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. विशेषतः जुन्या आणि धोकादायक अवस्थेतील इमारतींच्या दुरुस्ती तसेच पुनर्विकासासाठी मुख्यमंत्री विशेष निधीतून तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. येत्या पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर अनेक इमारतींची स्थिती गंभीर असल्याने मुंबईकरांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.आदित्य ठाकरे यांनी आपल्या पत्रात मुंबईतील उपकरप्राप्त म्हणजेच सेस इमारतींसह नॉन सेस इमारतींचाही प्रश्न गंभीर असल्याचे नमूद केले आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात या इमारतींच्या पुनर्विकासासाठी कायद्यात बदल करण्यात आले होते. मात्र, गेल्या दोन वर्षांपासून हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्याने हजारो इमारतींमधील रहिवासी अजूनही निर्णयाच्या प्रतीक्षेत आहेत.

# शिंदेसेनेत प्रवेशानंतरही बच्चू कडूंचा पहिला दणका


## दिव्यांगांच्या प्रश्नावर आंदोलनाचा थेट इशारा; मुख्यमंत्री–उपमुख्यमंत्र्यांना अल्टिमेटम

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

शिवसेनेत प्रवेश करून अवघ्या दहा दिवसांत विधान परिषदेवर निवडून आलेले बच्चू कडू आता पुन्हा आक्रमक भूमिकेत दिसत आहेत. राज्यातील दिव्यांग आणि नेत्रहीन बांधवांना मिळणारे संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान गेल्या काही महिन्यांपासून रखडल्याने बच्चू कडूंनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाच इशारा दिला आहे. दिव्यांगांच्या प्रश्नांकडे सरकारने तातडीने लक्ष द्यावे, अन्यथा मंत्रालयावर आंदोलन छेडावे लागेल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. त्यामुळे राजकीय वर्तुळातही या भूमिकेची जोरदार चर्चा सुरू झाली आहे.



राज्य सरकारकडून ४० टक्क्यांपेक्षा अधिक दिव्यांगत्व असलेल्या पात्र नागरिकांना संजय गांधी निराधार योजनेतून दरमहा अडीच हजार रुपयांचे मानधन दिले जाते. मात्र फेब्रुवारीपासून हजारो दिव्यांगांना हे पैसे मिळाले नसल्याचे समोर आले आहे. सलग फेब्रुवारी, मार्च आणि एप्रिल या तीन महिन्यांचे अनुदान थांबल्याने अनेक दिव्यांग आर्थिक संकटात सापडले आहेत. विशेषतः नेत्रहीन नागरिकांवर याचा मोठा परिणाम झाला असून रोजच्या जगण्यासाठीही त्यांना संघर्ष करावा लागत आहे.या पार्श्वभूमीवर नागपूर विभागातील विविध जिल्ह्यांमधून आलेल्या सुमारे ५० नेत्रहीन बांधवांनी मुख्यमंत्री सचिवालय गाठत आपली व्यथा मांडली. घरभाडे, वीजबिल, औषधोपचार आणि रोजच्या गरजा भागवताना प्रचंड अडचणी येत असल्याचे त्यांनी सांगितले. अनेक नेत्रहीन नागरिक रेल्वे स्थानके, बसस्थानके आणि सार्वजनिक ठिकाणी गोळ्या, बिस्किटे किंवा छोट्या वस्तू विकून उदरनिर्वाह करतात. शासनाच्या अडीच हजार रुपयांच्या मदतीवर त्यांचे जीवन अवलंबून असताना तीच मदत बंद झाल्याने त्यांच्यासमोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.याच मुद्द्यावर बच्चू कडूंनी सरकारवर निशाणा साधला. नेत्रहीनांनी मुख्यमंत्री कार्यालयावर मोर्चा काढल्याची बातमी पाहिल्यानंतर ही बाब अत्यंत वेदनादायी वाटल्याचे त्यांनी म्हटले. या संदर्भात आपण सातत्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि संबंधित सचिवांशी चर्चा करत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. सरकारने काढलेल्या काही जीआरमुळे अनेक दिव्यांगांना मानधनापासून वंचित राहावे लागत असल्याचा आरोप बच्चू कडूंनी केला. विशेषतः यूटीआय कार्ड मिळेपर्यंत मानधन रोखण्याचा निर्णय चुकीचा असून तो तातडीने रद्द करावा, अशी मागणी त्यांनी केली.बच्चू कडूंनी पुढे सांगितले की, दोन वेगवेगळ्या शासन निर्णयांमुळे जवळपास ५० टक्के दिव्यांग बांधवांना लाभ मिळत नाही. तहसीलदार आणि जिल्हाधिकारी कार्यालयात वारंवार फेऱ्या मारूनही अधिकाऱ्यांकडून समाधानकारक उत्तर दिले जात नाही. एका कार्यालयातून दुसऱ्या कार्यालयात पाठवले जाते, अशी तक्रार दिव्यांगांनी केली आहे. लाडक्या बहिणीच्या योजनेसाठी सरकारकडे निधी उपलब्ध आहे, मग दिव्यांगांच्या हक्काच्या पैशांसाठी निधी का नाही? असा संतप्त सवालही आंदोलक नेत्रहीनांनी उपस्थित केला.



# कंपनीच्या फायद्यापेक्षा शेतकऱ्यांचे हित महत्वाचे-पालकमंत्री डॉ.अशोक वुईके

## बेलोरा, जेना, पानवडाळा येथील पुनर्वसन, भुसंपादन व इतर समस्यांबाबत आढावा

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

चंद्रपूर हा औद्योगिक जिल्हा आहे. विविध कंपन्या येथे येऊन व्यवसाय करतात. मात्र ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी प्रकल्पासाठी घेतात, त्यांनाच वाऱ्यावर सोडत असल्याचे निदर्शनास आले आहे. शेतकऱ्यांची जमीन प्रकल्पासाठी घेतली असल्यास त्यांचे योग्य पुनर्वसन आणि स्थानिकांना रोजगार देणे हे कंपनीचे कर्तव्यआहे. मात्र याबाबतीत शेतकऱ्यांची लूट होत असेल, तर खपवून घेतल्या जाणार नाही, असा इशारा राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक वुईके यांनी दिला.



अरबिंदो कोल माईन्समुळे प्रभावित बेलोरा, जेना, पानवडाळा व इतर ११ गावांतील पुनर्वसन, भुसंपादन तसेच नागरी समस्यांच्या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते. बैठकीला जिल्हाधिकारी वसूमना पंत, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, वरोऱ्याचे उपविभागीय अधिकारी संदीप भस्के, उपजिल्हाधिकारी अतुल जटाळे (पुनर्वसन) संजय पवार (भुसंपादन), जिल्हा खनीकर्म अधिकारी वसीम सय्यद, तहसीलदार राजेश भांडारकर, वरोराचे पोलिस उपअधिक्षक संतोष बाकल, अरबिंदो कंपनीचे उपाध्यक्ष संजीवा राव, सहउपाध्यक्ष व्यंकट रेड्डी, सहाय्यक महाव्यवस्थापक रमेश वाकडे, अजय सिंग यांच्यासह गावकरी प्रवीण ठेंगणे, जनाचे सरपंच प्रभा बोढाले, उपसरपंच हरिश्चंद्र आसुटकर, हेमेंद्र धानोरकर व प्रकल्पग्रस्त शेतकरी उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री डॉ. वुईके म्हणाले, गावकऱ्यांच्या पुनर्वसनाबाबत कंपनीने कालमर्यादा ठरवून ठराविक वेळेत पुनर्वसन व इतर नागरी समस्यांची सोडवणूक करावी. कंपनीने प्रकल्पासाठी काही जमीन विकत घेतली आहे व उर्वरित जमीन अद्यापही घ्यायची आहे. फसवेगिरी करून व्यवसाय करत असाल, तर खपवून घेणार नाही, शेतकऱ्यांचे हित हे महत्त्वाचे आहे. कंपनीत स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून दिला पाहिजे. ज्यांना रोजगार दिला आहे, त्यांची यादी आधारकार्ड सह जिल्हा प्रशासनाला सादर करावी. शेतकऱ्यांच्या संयमालासुद्धा मर्यादा आहे, त्यामुळे कंपनी शेतकऱ्यांचे नुकसान करू नये, असे स्पष्ट निर्देश पालकमंत्री डॉ. अशोक वुईके यांनी दिले गावकऱ्यांनी मांडल्या समस्या : यावेळी गावकऱ्यांनी आपल्या समस्या मांडल्या. यात जोपर्यंत पुनर्वसन होत नाही तोपर्यंत कंपनीने कोळसा उत्खनन करू नये, कंपनीने मुख्य मार्ग तोडला आहे. प्रकल्पासाठी जमीन घेत असाल तर सर्वांना समान न्याय मिळाला पाहिजे. नोकरीमध्ये स्थानिकांना प्राधान्य दिले पाहिजे.

# चंद्रपूरमध्ये ‘एमडी’ ड्रग्जचा मोठा साठा जप्त; नागपूरचा तरुण अटकेत

## १५.९० लाखांचा मुद्देमाल हस्तगत

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

जिल्ह्यात वाढत्या अमली पदार्थ तस्करीविरोधात पोलिसांनी मोठी कारवाई करत १०१ ग्रॅम ‘एमडी’ (एमड ) ड्रग्जसह एका तरुणाला अटक केली आहे. या कारवाईत एकूण १५ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, या प्रकरणातील आणखी दोन आरोपींचा शोध सुरू आहे.



पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी ) पथक वरोरा परिसरात गस्त घालत असताना त्यांना खात्रीशीर गोपनीय माहिती मिळाली. नागपूर येथील एक इसम मोठ्या प्रमाणात ड्रग्ज घेऊन चंद्रपूरकडे येणार असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ सापळा रचला.वरोरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खंबाळा शिवारात संशयित इसम मोपेडवरून येताना दिसताच त्याला अडवून पंचासमक्ष झडती घेण्यात आली. यावेळी त्याच्याकडून १०१ ग्रॅम एमडी ड्रग्ज पावडर आढळून आली. चौकशीत आरोपीने हा अमली पदार्थ नागपूर व चंद्रपूर येथील साथीदारांच्या मदतीने विक्रीसाठी आणल्याची कबुली दिली.अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव अमित कृष्णा गजभिये (वय २३, रा. इंदोरा, नागपूर) असे असून, या प्रकरणात हर्षल टेंभेकर (रा. नागपूर) व सोहेल शेख (रा. चंद्रपूर) हे दोन आरोपी फरार आहेत.पोलिसांनी आरोपीकडून जप्त केलेल्या मुद्देमालात १५ लाख रुपये किमतीचे एमडी ड्रग्ज, १.१० लाखांचा मोबाईल फोन आणि १.८० लाखांची मोपेड यांचा समावेश आहे. या प्रकरणी वरोरा पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्याच्या कलम ८(क) व २२(क) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

# आ.मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने चंद्रपूर जिल्ह्यातील मामा तलाव विकासाला गती

## जोडणी प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे जिल्हाधिकारी यांना निर्देश

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने चंद्रपूर जिल्ह्यासह बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील माजी मालगुजारी व इतर तलावांच्या विविध समस्यांबाबत मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील दालनात आयोजित या बैठकीत तलाव विकास, दुरुस्ती, सौंदर्यीकरण, जलसंधारण, सिंचन क्षमता वाढ व तलाव पुनरुज्जीवनाशी संबंधित विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रत्यक्ष विकासाला गती देणारे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय यावेळी घेण्यात आले.

यावेळी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील तलावांची सद्यस्थिती, तलावांमध्ये मोठ्या प्रमाणावर साचलेला गाळ, दुरुस्तीअभावी घटलेली जलसाठा क्षमता तसेच ग्रामीण भागातील पाणी उपलब्धतेवर होत असलेला परिणाम याबाबत सविस्तर माहिती मांडली. जलसंधारणाच्या माध्यमातून शेती, पाणीपुरवठा आणि ग्रामीण विकासाला अधिक गती मिळावी, तसेच तलाव दुरुस्ती व सौंदर्यीकरणाची कामे तातडीने पूर्ण व्हावीत, यासाठी आवश्यक निधी व प्रशासकीय मान्यता त्वरीत देण्याची मागणी आ. मुनगंटीवार यांनी यावेळी केली. आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी बैठकीत माजी मुख्यमंत्री मा. सा. कन्नमवार यांचे जन्मगाव असलेल्या मारोडा येथील तलावाच्या सौंदर्यीकरणाचा मुद्दा प्राधान्याने मांडत या ऐतिहासिक तलावाच्या विकासासाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली. त्यांच्या पाठपुराव्यानंतर मारोडा तलावाच्या सौंदर्यीकरणाबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात आला. तसेच चंद्रपूर जिल्हासह बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील एकूण ४५ तलावांच्या दुरुस्ती व पुनरुज्जीवनासाठी अंदाजे १५ कोटी ७५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याबाबत सहमती दर्शविण्यात आली. तलाव फुटीच्या आपत्कालीन परिस्थितीचा विचार करून आवश्यक दुरुस्ती व संरक्षणात्मक उपाययोजनांसाठी जिल्हा नियोजन समिती (डीपीसी) अंतर्गत निधी उपलब्ध करण्याबाबतही सकारात्मक भूमिका घेण्यात आली.



यावेळी लपा तलावाला मामा तलावाशी जोडण्यासाठीचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश सचिव जितेंद्र पापळकर यांनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना दिले. तसेच संबंधित सर्व प्रस्ताव प्राधान्याने शासनाकडे सादर करून आवश्यक प्रशासकीय मान्यता मिळविण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. आगामी जून २०२६ अधिवेशनातील व्हाईट बुक मध्ये संबंधित कामांचा समावेश करण्याबाबतही आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्यानंतर दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित असलेल्या जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी संबंधित तलावांची माहिती सादर करत आवश्यक प्रस्ताव शासनाकडे तातडीने सादर करण्यात येतील, असे सांगितले. जलसंधारण, शेती विकास, ग्रामीण भागातील पाणी उपलब्धता आणि पर्यावरणीय संतुलनाच्या दृष्टीने बैठकीत घेण्यात आलेले निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण असून बल्लारपूर विधानसभा क्षेत्रासह संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्याच्या विकासाला नवी दिशा देणारे ठरणार असल्याचा विश्वास आ. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

बैठकीला खटके प्रादेशिक जलसंधारण अधिकारी नागपूर, प्रकाश पाटील अधीक्षक अभियंता मंत्रालय, निलिमा मंडपे जिल्हा जलसंधारण अधिकारी चंद्रपूर, जिल्हा परिषद कार्यकारी अभियंता संदीप खांबाईत तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे चंद्रपूर जिल्हाधिकारी वसुमना पंत तसेच जिल्हा परिषद चंद्रपूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह सहभागी झाले होते.

# संपादकीय

## तापतोय सूर्य आणि राजकारणही!

विदर्भात सध्या उन्हाचा कहर सुरू आहे. इकडची दोन-चार शहरे कधी जगात, तर कधी भारतात नंबर एकची उष्ण ठरत आहेत. विधान परिषदेच्या निवडणुकीने राजकीय तापमानही वाढविले आहे. कारण आहे, प्रहारचे नेते ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू यांना एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून मिळालेली उमेदवारी, म्हणजेच आमदारकी.अभिनव आंदोलनांनी राज्यभर प्रसिद्ध पावलेले कडू हे मूळचे शिवसैनिक. विद्यार्थी सेनेपासून त्यांनी राजकीय कारकीर्द सुरू केली. कर्जाच्या परतफेडीसाठी बँकांनी शेतकऱ्यांची ट्रॅक्टर जप्ती चालवली तेव्हा त्यांनी केलेले 'सुतळी टमबॉम्ब' आंदोलन खूप गाजले. त्यानंतर त्यांनी अनेक लक्षवेधी आंदोलने केली. कधी अर्धे शरीर जमिनीत गाडून 'अर्ध दफन' आंदोलन केले, कधी शेतकऱ्यांसाठी रुमणे आंदोलन, तर कधी सामूहिक मुंडण केले. दारूबंदी व्हावी म्हणून दारूच्या दुकानापुढे दूध वाटले. विधिमंडळाच्या एका हिवाळी अधिवेशनात त्यांनी उंच जलकुंभावर चढून 'शोले स्टाइल' आंदोलन केले. तत्कालीन उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांनी त्या टाकीवर चढून कडूंशी चर्चा केल्यामुळे ते खूपच चर्चेत आले. यांच्या आंदोलनातून ना सोनिया गांधी सुटल्या, ना नरेंद्र मोदी. सोनियांना घर बांधून देण्यासाठी ते गेले होते. नागपूर ते वडनगर अशी 'आसूड यात्रा' काढून मोदींच्या वडनगरात जाऊन ते रक्तदान करून आले. आता त्यांचे शिवसेनेत जाणे, स्वत:चा प्रहार जनशक्ती पक्ष शिवसेनेत विलीन करणे हा सध्या राजकीय संशोधनाचा विषय बनला आहे. भाजपचे आमदार म्हणतात, त्यांच्यावरील गुन्ह्यांवर कारवाई होऊ नये म्हणून ते सत्ताशरण झाले. कुणाला वाटते, भाजपला झटका देण्यासाठी शिंदेंनी सोडलेला हा बाण आहे.भाजप आणि कडूंची खेटाखेटी ही आजची नव्हे. १९९९ साली भाजप-शिवसेनेची युती असताना कडू हे शिवसेनेचे तालुका प्रमुख होते. ते भाजपचे नेते विनायकराव कोरडे यांच्या विरोधात अपक्ष लढले. मतविभाजन होऊन काँग्रेसचा विजय झाला. कोरडे समर्थकांनी 'मातोश्री'कडे आग्रह धरून कडूंवर कारवाई करायला लावली. कडूंनी धनुष्य सोडला आणि 'प्रहार' संघटना सुरू केली. सलग चार वेळा 'प्रहार'चे आमदार म्हणून निवडून आले. उद्धव ठाकरेंच्या मंत्रिमंडळात ते राज्यमंत्री होते. गुवाहटीच्या बंडात सहभागी होऊनसुद्धा त्यांना पुन्हा मंत्रिपद मिळाले नाही. खोक्यांचे आरोप झाले. ही त्यांची नाराजी होती. त्यांनी दिव्यांगासाठी चांगले काम केले. त्याच वेळी, कधी लाच मागणाऱ्याला मार, कधी अधिकाऱ्याच्या कानाखाली वाजव, कधी मंत्रालयात मारहाण कर, असे कायदा हातात घेणारे प्रतापही त्यांच्या नावे जमा आहेत.'शिंदेंना मुख्यमंत्री करेपर्यंत स्वस्थ बसणार नाही,' असे म्हणत कडूंनी भाजपला डिवचले. 'आता विधानसभेत जिंकण्याची संधी नसल्याने कडू परिषदेवर गेले,' असा टोला भाजप आमदारांनी लगावला आहे. 'प्रहार'चा गावोगावी पसरलेला कार्यकर्ता अस्वस्थ आहे. स्थानिक निवडणुकांत भाजप-सेनेची युती झाली तर 'प्रहार' कुठे असेल, शिवसेना आणि 'प्रहार' कार्यकर्त्यांत जागांवरून संघर्ष झाला तर कौल कुणाला मिळेल, असे काही प्रश्न त्यांच्या समोर आहेत. 'जनतेने संधी दिली असती तर नेत्याकडे गेलो नसतो,' असे म्हणत कडूंनी जनतेलाही बोल लावला आहे. राजकारण करताना, लोक अंगावर घेताना कडूंनी त्यांच्यातील आंदोलनकर्ता गमावू नये, असे सामान्य जनतेला वाटते. अन्यथा, 'बच्चू कडू सब का भिडू' ही त्यांच्याबद्दलची भावना 'बच्चू कडू सब को भिडू' अशी होऊ शकेल.

# गुजरातमधील २००२ च्या पॅटर्ननुसार देशभर दंगली घडवण्याचे भाजपचे षडयंत्र: हर्षवर्धन सपकाळ यांचा खळबळजनक आरोप




दैनिक वादळ वार्ता

**मुंबई I प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष २०२९ च्या निवडणुका जिंकण्यासाठी देशभर धार्मिक तेढ निर्माण करत असून, २००२ च्या गुजरात दंगलींप्रमाणेच हिंसाचार घडवण्याचे षडयंत्र आखले जात आहे, असा खळबळजनक आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी शुक्रवारी केला. पाच राज्यातील निवडणुकीनंतर काही राज्यांत सुरू झालेला हिंसाचार हा याच मोठ्या कारस्थानाचा भाग असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.टिळक भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत सपकाळ यांनी केंद्र सरकार आणि भाजपावर अनेक गंभीर प्रश्नांची सरबत्ती केली. सपकाळ यांनी जनगणना आणि त्यानंतर होणाऱ्या मतदारसंघ पुनर्रचनेवर भाष्य करताना सांगितले की, जानेवारी २०२८ मध्ये सुरू होणाऱ्या डिलिमिटेशन प्रक्रियेसाठी कोणत्या निवृत्त न्यायाधीशाला समितीत घ्यायचे, हे भाजपने आधीच ठरवले आहे. इतकेच नाही, तर पुनर्रचनेनंतरचा मतदारसंघांचा नकाशाही आत्ताच तयार आहे. ही सर्व प्रक्रिया लोकशाहीला पायदळी तुडवणारी आहे. तामिळनाडूतील राजकीय समीकरणांवर बोलताना त्यांनी जोसेफ विजय यांच्या 'टीव्हीके' पक्षाला दिलेल्या पाठिंब्याचे समर्थन केले. स्थानिक नेते आणि कार्यकर्त्यांची निवडणुकीपूर्वीच आघाडीची इच्छा होती. लोकशाही आणि संविधान वाचवण्यासाठी लढा देणाऱ्या पक्षांसोबत उभे राहण्यास काँग्रेस कटिबद्ध आहे, असे ते म्हणाले.मुंबई महानगरपालिकेतील भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर बोलताना सपकाळ यांनी शेलक्या शब्दांत भाजपचा समाचार घेतला. ते म्हणाले: भ्रष्टाचारासाठी भाजपला आता शौचालयाची जागाही कमी पडत आहे. आधी सुलभ शौचालयात भ्रष्टाचार केला आणि आता मनपाच्या कामातही तेच सुरू आहे. भाजपमध्ये मोहित कंबोज यांच्यासारख्यांना मलिदा मिळतो आणि सामान्य कार्यकर्त्यांच्या नशिबी मात्र शौचालयाची जागा येत असल्याचेही ते म्हणाले.

# ठाण्यात व्यवसायाचे अमिष दाखवून दोघांचा महिलेवर अत्याचार



दैनिक वादळ वार्ता

**मुंबई I प्रतिनिधी**

ठाण्यात रियल इस्टेटच्या व्यवसायाचे अमिष दाखवून महिलेवर अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. ठाण्यातील वैशाली नगर, भटवाडी भागात राहणारी महिला नवी मुंबई येथे खासजी कंपनीत नोकरी करत होते. घराला हातभर लागण्यासाठी छोटी मोठी रियल इस्टेटची कामे करत असे. आपल्या लोकमान्य नगर, ठाणे येथे राहण्यास असलेल्या मैत्रीणीने ओळख करून दिलेल्या दोघांनी अत्याचार केला असून राजू सावळकर, वय ४० वर्षे, रा. साकीनाका, मुंबई व त्याचा मित्र विनायक यांनी आमचे खूप बिझनेस आहेत तू खूप पैसे कमवशील तुला रियल इस्टेटचा बिझनेस देतो आमचे ठाण्यात खूप बिल्डराबरोबर ओळख असून तुला मोठी कामे मिळतील असे आश्वासन देऊन ०३/०५/२०२६ रोजी भेटले. विनायक व राजू यांनी आपली फोर्ड कंपनीची कार मध्ये घेउन भिवडी येथे गेल्यावर मोका पाहून दारू पिले त्यांनी जेवण केले. जेवताना विनायक म्हणाला की मी मोठा क्रिमीनल असून बेकायदेशीर दारू विक्री करण्याचा मोठा व्यवसाय आहे. आम्हाला त्या व्यवसायातून लाखो रूपये मिळतात. सदर महिलेला जूस मध्ये नशा औषध देऊन खारेगाव टोलनाकाजवळील दोघांनीही कार मध्ये आळीपाळीने अत्याचार केला प्रसंगी सदर महिलेने अँड. शितल बोरडे यांची कायदेशीर मदत घेत कळवा पोलीस स्टेशन, ठाणे येथे गुन्हा क्र ०२४६/२०२६ नुसार दाखल करण्यात आला असून दोन्हीही आरोपीना पोलीसांनी अटक केली असून पोलीस पुढील तपास सुरु आहे.

# महाराष्ट्रात मान्सूनपूर्व पावसाची दमदार एन्ट्री



दैनिक वादळ वार्ता

**मुंबई I प्रतिनिधी**

अल निनोचा प्रभाव आणि हवामान खात्याचे जुने अंदाज फेटाळून लावत महाराष्ट्रात मान्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावण्याची चिन्हे दिसत आहेत. पुढील तीन ते चार दिवस राज्यातील अनेक भागांत सोसाट्याच्या वाऱ्यासह मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. मात्र, मुंबई आणि उपनगरांतील नागरिकांना अद्याप पावसासाठी प्रतीक्षा करावी लागणार असून दमट हवामान आणि उकाड्याचा सामना करावा लागणार आहे.भारतीय हवामान विभागाच्या ताज्या अंदाजानुसार, ८ मे रोजी दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही भागांत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. विशेषतः कोल्हापूर, सातारा, सांगली, बीड, लातूर आणि धाराशिव या जिल्ह्यांमध्ये ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वादळी वारे वाहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली असून या जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**रत्नागिरी-सिंधुदुर्ग किनारपट्टीवर मुसळधार पावसाचा अंदाज**

हवामान तज्ज्ञांच्या मते, कोल्हापूर, सातारा आणि पुण्याच्या डोंगराळ भागात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. तर रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग किनारपट्टीवर काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मान्सूनपूर्व वारे सक्रिय झाल्याने वातावरणात मोठा बदल जाणवत असून अल निनो आणि सुपर निनोचा प्रभाव कमी होत असल्याचे संकेत मिळत आहेत.

**मुंबईकरांना पावसाची प्रतीक्षा कायम**

राज्यातील अनेक भागांत पावसाची शक्यता असली तरी मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड या किनारी जिल्ह्यांत पुढील चार ते पाच दिवस दमट आणि उकाड्याचे वातावरण कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. त्यामुळे मुंबईकरांना पावसाच्या सरींपेक्षा घामाच्या धारांचा अधिक सामना करावा लागणार आहे.

**मराठवाड्यात मेघगर्जनेसह विजांचा इशारा**

प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबईकडून प्राप्त माहितीनुसार, पुढील काही तासांत हिंगोली, लातूर आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. काही भागांत हलक्या स्वरूपाच्या पावसाचीही नोंद होऊ शकते.हवामान विभागाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून, वादळी वाऱ्याच्या काळात झाडाखाली किंवा उघड्या जागेत थांबणे टाळण्याचा सल्ला दिला आहे.

# ZEE5 च्या वतीने १५ मे २०२६ रोजी तिघी च्या वर्ल्ड डिजिटल प्रीमियरची घोषणा!

## चित्रपटगृहांतील तुफान यशानंतर कौतुकास पात्र ठरलेल्या मराठी कलाकृतीचे खास डिजिटल पदार्पण ZEE5 वर

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई I प्रतिनिधी**

चित्रपटगृहातील प्रदर्शनादरम्यान समीक्षकांची प्रशंसा आणि प्रेक्षकांचे अमाप कौतुक लाभलेला 'तिघी' १५ मे २०२६ रोजी ZEE5 वर वर्ल्ड डिजिटल प्रीमिअरसह जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी सज्ज आहे. ही कलाकृती सुप्री ॲडव्हर्टायझिंग अँड एंटरटेनमेंट प्रायव्हेट लिमिटेड निर्मित असून दिग्दर्शिका जीजिवीशा काळे यांचा पहिला चित्रपट आहे. तिघी हे कौटुंबिक गुंतागुंत, शांतता आणि नातेसंबंधांना आकार देणाऱ्या न सांगितलेल्या सत्यांचा शोध घेणारे भावनिकदृष्ट्या भारलेले मराठी नाट्य आहे.हा चित्रपट स्वाती रानडे-कर्णिक नेहा पेंडसे बायस या ४० वर्षीय महिलेचा मागोवा घेतो. जिचे मुंबईतील स्थिर जीवन वाढत्या वैयक्तिक आणि आर्थिक दबावाखाली उलगडण्यास सुरुवात होते. जेव्हा तिला कळते की तिची विभक्त झालेली आई, हेमलता रानडे भारती आचरेकर हिच्या आयुष्याचा शेवट जवळ येत आहे, तेव्हा स्वाती तिच्या बऱ्याच काळापासून मागे राहिलेल्या भूतकाळाला सामोरे जाण्यासाठी पुण्यातील तिच्या बालपणीच्या घरी परतते. तिथे ती आणि तिची धाकटी बहीण सारिका सोनाली कुलकर्णी पुन्हा एकत्र येतात. सारिका ही आजारी आईची काळजी घेत असते. आरोप, निराकरण न झालेला संताप आणि दीर्घकाळ दडपलेल्या जखमांमुळे पुनर्मिलन तणावपूर्ण आणि भावनिक होते. तीन स्त्रिया अपराधीपणा, राग आणि असहायतेशी झुंज देत असताना, आई स्वत:चे शेवटचे दिवस त्यांच्यापासून दूर आश्रमात घालवण्याची इच्छा व्यक्त करते. तेव्हा त्यांच्या नाजूक बंधाची कसोटी तीव्र होते.आठवणी आणि शांततेने भरलेल्या घरात वसलेले, तिघी हे कुटुंब त्याग, रहस्ये आणि भावनिक अंतराच्या शक्तींद्वारे काय सहन करतात याचा एक मर्मस्पर्शी शोध कलाकृती घेते. याच शक्ती त्यांच्यात बंध निर्माण करतात आणि खंडित करू शकतात.भारती आचरेकर, नेहा पेंडसे बायस आणि सोनाली कुलकर्णी यांच्यासह निपुण धर्माधिकारी, जैमिनी पाठक, पुष्कराज चिरपुटकर, सुव्रत जोशी, मृण्मयी गोडबोले आणि संजय मोने यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटात अत्यंत सकस अभिनय वठवला आहे. जो या अनेक पदरी असलेल्या कथेला प्रामाणिकता आणि भावनिक सखोलता देतो.

प्रीमिअरबद्दल बोलताना, हेमा व्ही. आर., चीफ चॅनेल ऑफिसर-झी मराठी आणि बिझनेस हेड-ZEE5 मराठी म्हणाल्या, नएए५ मध्ये आम्ही मानवी अनुभव आणि भावनिक सत्यांमध्ये खोलवर रुजलेल्या कथा सांगण्यास वचनबद्ध आहोत. 'तिघी' हा एक जिव्हाळ्याचा आणि विचार करायला लावणारा चित्रपट आहे. ही कलाकृती प्रामाणिक तसेच संवेदनशीलतेने कौटुंबिक नातेसंबंधांचा शोध घेते. तिचा वर्ल्ड डिजिटल प्रीमिअर सादर करताना आणि ही आकर्षक कथा जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचवताना आम्हाला आनंद होत आहे.दिग्दर्शिका जीजिवीशा काळे पुढे म्हणाली, तिघी ही एक सखोल वैयक्तिक कथा असून कुटुंबामधील शांतता आणि भावनिक गुंतागुंत प्रतिबिंबित करते. माझा असा विश्वास आहे की जे वैयक्तिक आहे ते देखील सार्वत्रिक आहे आणि हा चित्रपट प्रामाणिकपणे व असुरक्षिततेने कथा सांगण्याचा माझा प्रयत्न आहे. चित्रपटगृहातील प्रदर्शनादरम्यान मिळालेला प्रतिसाद अविश्वसनीय, उत्साहवर्धक आहे. नएए५ सह ही कलाकृती आता अधिक व्यापक प्रेक्षकांपर्यंत पोहोचेल, म्हणून मी आभारी आहे.

नेहा पेंडसे बायस म्हणाली, स्वाती हे असुरक्षितता, सामर्थ्य आणि शांत संघर्षाने भरलेले एक पात्र आहे. ज्या गोष्टीने मला तिघीकडे आकर्षित केले ती म्हणजे प्रामाणिकपणा, नातेसंबंधांमध्ये वाहून नेणारे भावनिक वजन तसेच आपण अनेकदा न बोलून दाखवलेल्या गोष्टीचे करण्यात आलेले चित्रण. ही कथा खूप वास्तविक वाटली. प्रेक्षकांनी नएए५ वर ती अनुभवावी यासाठी मी उत्सुक आहे.




सोनाली कुलकर्णी हिने सांगितले, सारिका ही एक अशी व्यक्ती आहे जिने अनेक वर्षे जबाबदारी, त्याग आणि दडपलेल्या भावनांत आयुष्य काढले आहे. हा चित्रपट अत्यंत संवेदनशीलतेने तसेच सखोलतेने तीन महिलांमधील गतिशीलतेचा शोध घेतो. मला विश्वास आहे की गुंतागुंतीचे कौटुंबिक नातेसंबंध अनुभवलेल्या कोणाही व्यक्तीला 'तिघी' आपलासा वाटेल. नएए५वर प्रीमिअरसह, मला आनंद आहे की तो आता आणखी प्रेक्षकांपर्यंत पोहोचेल.

ZEE5 वर १५ मे २०२६ रोजी तिघी'चा वर्ल्ड डिजिटल प्रीमियर चुकवू नका!

## श्री क्षेत्र भगवानगडास वनविभागाकडून चार हेक्टर जागेचा ताबा वनपरिक्षेत्र अधिकारी मिलिंद गोवेकर यांच्या हस्ते कागदोपत्री हस्तांतर



दैनिक वादळ वार्ता

श्री क्षेत्र भगवानगड संस्थानासाठी महत्त्वपूर्ण ठरलेल्या वनविभागाच्या सुमारे चार हेक्टर जागेचा अधिकृत ताबा आज संस्थानकडे देण्यात आला. वनपरिक्षेत्र अधिकारी मिलिंद गोवेकर यांच्या हस्ते संबंधित जागेची कागदोपत्री हस्तांतर. न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांच्याकडे करण्यात आली.भगवानगड हे राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असून, या जागेमुळे गडाच्या विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. भाविकांसाठी विविध सुविधा, धार्मिक उपक्रम तसेच विकासकामांसाठी या जागेचा उपयोग होणार असल्याची माहिती संस्थानच्या वतीने देण्यात आली.

यावेळी प्रत्यक्ष जागेवर पाहणी करून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यात आली. संपूर्ण प्रक्रिया नियमानुसार व शांततेत पार पडली. या प्रसंगी शेवगाव वनपाल एकशिंगे, वनपाल मंचरे, वनरक्षक नाईकवाडे, वनरक्षक पालवे, वनरक्षक साळवे, वनसेवक बाळु बटुळे तसेच वनपरिक्षेत्र पाथर्डी येथील कर्मचारी उपस्थित होते.

# महाराजस्व अभियानात जिल्हाधिकारी यांचाकडून विविध स्टॉलची पाहणी

**दैनिक वादळ वार्ता**
**चंद्रपूर | प्रतिनिधी**

तहसील कार्यालय व मंडळ अधिकारी कार्यालय, चंद्रपूरच्या वतीने शहरातील मातोश्री विद्यालय येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानात जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी विविध स्टॉलची पाहणी करून शुभारंभ केला. तसेच या स्टॉलच्या माध्यमातून नागरिकांनी विविध शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी आमदार किशोर जोरगेवार उपस्थित होते.
मार्गदर्शन करतांना आमदार जोरगेवार म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी, नागरिकांना शासकीय सेवा एक जागेवर मिळाव्यात यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने महराजस्व अभियान सुरू केले आहे. चंद्रपूर तालुक्यातील हे पाचवे शिबीर आहे. यापूर्वीच्या घुग्गस व पडोली मंडळातील शिबिरात मोठ्या प्रमाणात लाभाचे वितरण करण्यात आले. तालुका



महसूल प्रशासनाने अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने शिबिरे पार पाडली. यानंतर देखील चंद्रपूर नियमित शिबिरे आयोजित करावीत, जेणेकरून नागरिकांना जलद सुविधा मिळतील.
यावेळी उपविभागीय अधिकारी विशालकुमार मेश्राम, तहसीलदार विजय पवार, नायब तहसीलदार राजू धांडे, ओंकार ठाकरे, मंडळ अधिकारी प्रवीण वरभे आदी उपस्थित होते.मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप : यावेळी मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचे प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. यात लक्ष्मी मुक्ती योजनेंतर्गत किसान लोणगाडगे, ऋषी निब्रड, वारलू सपाट, शंकर लोणगाडगे, प्रभाकर ताजणे यांना, जिवंत सातबारा मोहिमेंतर्गत सुशीलाबाई देहाळकर, सुधाकर भोंगरे, विशाल काळे, भारत काळे, कवडू तडस यांना राशनकार्ड लाभार्थ्यांमध्ये किरण शर्मा, कविता पुंड, विद्या जगताप यांना तर सजंय गांधी योजना / इंदिरा गांधी योजना / श्रावणबाळ योजनेंतर्गत तुळशीराम रामटेके, वेदांत गवळी, रमेश गुरुनुले, स्निग्धा मंडल, जीत मल्लीक, गोविंदराव कोडापे आदींचा समावेश होता.

# कासार सिरसी पोलिसांचा अभिनव उपक्रम:एक हेल्मेट, एक जीवन मोहिमेद्वारे जनजागृतीवर भर

**दैनिक वादळ वार्ता**
**निलंगा | प्रतिनिधी**

निलंगा तालुक्यातील कासार सिरसी:येथे रस्ते अपघातांचे वाढते प्रमाण आणि त्यात होणारी जीवितहानी रोखण्यासाठी कासार सिरसी पोलीस विभागाने कंबर कसली आहे. शहरात सुरक्षिततेचा संदेश पोहोचवण्यासाठी पोलिसांनी ***'एक हेल्मेट, एक जीवन'*** ही विशेष जनजागृती मोहीम हाती घेतली असून, तंत्रज्ञान आणि प्रत्यक्ष कृतीचा मेळ घालत नागरिकांना सुरक्षित प्रवासाचे आवाहन केले आहे.




***डिजिटल फलक आणि पोस्टर्सनी वेधले लक्ष***
या मोहिमेचे वैशिष्ट्य म्हणजे पोलिसांनी केवळ पारंपरिक पद्धतीवर अवलंबून न राहता आधुनिक साधनांचा वापर केला आहे. शहराच्या मुख्य चौकांमध्ये आणि सर्व प्रवेशद्वारांवर मोटारसायकलींवर *डिजिटल डिस्प्ले बोर्ड* बसवण्यात आले आहेत. यासोबतच आकर्षक पोस्टर्सच्या माध्यमातून 'हेल्मेट का वापरावे?' याचे महत्त्व पटवून दिले जात आहे. शहरात शिरणाऱ्या प्रत्येक वाहनधारकाचे लक्ष हे फलक वेधून घेत आहेत.

***मोहिमेमागची भूमिका आणि वास्तव***
पोलीस विभागाकडील उपलब्ध आकडेवारीनुसार, अलीकडच्या काळात रस्ते अपघातांमध्ये गंभीर दुखापत होण्याचे आणि मृत्यूचे प्रमाण चिंताजनक रितीने वाढले आहे.

***महत्त्वाचे निरीक्षण:*** अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्यांमध्ये अशा दुचाकीस्वारांची संख्या मोठी आहे, ज्यांनी प्रवासादरम्यान हेल्मेट परिधान केले नव्हते. डोक्याला बसणारा किरकोळ मारही जीवघेणा ठरू शकतो, हेच वास्तव समोर ठेवून 'एक हेल्मेट, एक जीवन' हा संदेश घराघरात पोहोचवण्याचे उद्दिष्ट पोलिसांनी ठेवले आहे.

***केवळ दंड नाही, तर समुपदेशनावर भर***
वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई तर केली जात आहेच, पण त्यासोबतच पोलिसांकडून . नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दुचाकीस्वारांना थांबवून त्यांचे सविस्तर समुपदेशन केले जात आहे. 'तुमचे आयुष्य तुमच्या कुटुंबासाठी किती महत्त्वाचे आहे' याची जाणीव करून देऊन त्यांना हेल्मेट वापरण्याची शपथ दिली जात आहे. ***नागरिकांसाठी आवाहन*** अपघात टाळणे ही केवळ पोलिसांची जबाबदारी नसून ते प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. हेल्मेट हे ओझे नसून ते तुमचे सुरक्षा कवच आहे, असे आवाहन कासार सिरसी पोलीस विभागामार्फत करण्यात आले आहे.

## दोन नगर परिषदांचा अतिरिक्त कार्यभार; मुख्याधिकारी कोणत्या दिवशी कुठे? नागरिकांची माहिती फलकाची मागणी

**दैनिक वादळ वार्ता**

दारव्हा नगर परिषदेचे मुख्य अधिकारी केदारे हे एकाच जाग्याहून तीन नगर परिषदेचे शेळ्या हाकत आहे .यवतमाळ जिल्ह्यातील नेर-नवाबपुरा, दिग्रस व दारव्हा नगर परिषदांचा पदभार दोन नगर परिषदचा अतिरिक्त कार्यभार एकाच मुख्याधिकाऱ्याकडे देण्यात आल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.




मुख्याधिकारी श्री. विठ्ठल केदारे यांच्याकडे तीन नगर परिषदांचा कारभार असल्याने नागरिकांना मुख्याधिकारी कोणत्या दिवशी कोणत्या नगर परिषदेत उपलब्ध राहतील? याची स्पष्ट माहिती मिळत नसल्याची तक्रार आहे. अनेक नागरिक दूरवरून नगर परिषद कार्यालयात येतात; मात्र अधिकारी उपलब्ध नसल्याने त्यांना परत जावे लागत असल्याचे सांगितले जात आहे.
जन्म-मृत्यू दाखले, पाणीपुरवठा, कर, बांधकाम परवानगी, तक्रार निवारण यासारखी कामे प्रलंबित राहत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. नागरिकांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की, मुख्याधिकारी कोणत्या दिवशी कोणत्या नगर परिषदेत उपस्थित राहणार याचे साप्ताहिक वेळापत्रक प्रत्येक नगर परिषद कार्यालयाच्या दर्शनी भागावर फलकाद्वारे लावण्यात यावे. तसेच ही माहिती सोशल मीडिया व अधिकृत नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात यावी, जेणेकरून सामान्य नागरिकांची गैरसोय टाळता येईल.
दरम्यान, एकाच अधिकाऱ्याकडे तीन ठिकाणांचा कार्यभार देण्यामागील नेमके कारण काय? असा प्रश्नही नागरिकांकडून उपस्थित केला जात असून प्रशासनाने याबाबत स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी मागणी होत आहे.

# उड्डाणपुलाचं काम की मृत्यूचा सापळा? गडचांदूरकरांचा जीव धोक्यात; नगरसेवक हिमांशु नामवाड यांचा आंदोलनाचा इशारा

**दैनिक वादळ वार्ता**
**कोरपना | प्रतिनिधी**

गडचांदूर शहरातील मुख्य चौकात सुरू असलेल्या उड्डाणपुलाच्या बांधकामामुळे नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा गंभीर आरोप होत आहे. कामाच्या ठिकाणी उभारण्यात आलेल्या उंच लोखंडी पत्र्यांमुळे वाहनधारकांना समोरून येणारी वाहतूक दिसत नसल्याने अपघाताचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.
विशेषतः चौकात वळण घेताना किंवा रस्ता ओलांडताना दुचाकीस्वार, चारचाकी चालक आणि पादचारी यांना मोठी कसरत करावी लागत आहे. जड वाहनांची अचानक समोरासमोर धडक होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.
दरम्यान, नगरसेवक हिमांशु नामवाड यांनी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी भेट देऊन कंत्राटदार कंपनी *'विद्या इन्फ्राबिल्ट'*च्या व्यवस्थापकाला चांगलेच धारेवर धरले. लोखंडी पत्र्यांमुळे चालकांना अक्षरशः अंदाजाने वाहन चालवावे लागत आहे. प्रशासनाने तात्काळ उपाययोजना न केल्यास येथे कधीही भीषण अपघात होऊ शकतो, असा इशारा त्यांनी दिला.यावेळी त्यांनी बंद पत्र्यांऐवजी जाळीदार नेट शेड लावण्याची मागणी केली. त्यामुळे समोरील वाहतूक स्पष्ट दिसेल आणि अपघाताचा धोका कमी होईल, असे त्यांनी सांगितले.सुरक्षेच्या दृष्टीने तातडीने बदल न केल्यास जनतेच्या सुरक्षेसाठी तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा थेट इशारा नगरसेवक हिमांशु नामवाड यांनी प्रशासन आणि संबंधित कंत्राटदार कंपनीला दिला आहे.



# समाजकल्याण खात्याला अधिक उंचीवर नेण्यासाठी अधिकाऱ्यांनी काम करावे-सामाजिक न्याय मंत्री शिरसाट

## सामजिक न्याय मंत्र्यांच्या हस्ते अधिकाऱ्यांच्या दोन दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन

**दैनिक वादळ वार्ता**
**पुणे | प्रतिनिधी**

सामाजिक न्याय विभागाकडे समाजाचा बघण्याचा दृष्टिकोन दिवसेंदिवस बदलत आहे, आगामी काळातही कामात सातत्य ठेवून समाजकल्याण खात्याला अधिक उंचीवर नेण्यासाठी आणखीन चांगले काम करावे; 'सामाजिक न्याय' संकल्पना डोळ्यासमोर ठेवून समाजातील शेवटच्या घटकांना न्याय देण्यासाठी अधिकाऱ्यांनी काम करावे, असे आवाहन राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी केले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण व संशोधन संस्थेच्यवतीने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिकाऱ्यांच्या लोणावळा येथे आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी विभागाचे सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, आयुक्त दिपा मुधोळ-मुंडे, सामाजिक न्याय खात्यातील सहसचिव सो.ना. बागुल, उपसचिव वर्षा देशमुख, अवर सचिव सतीश खैरमोडे, राज्यातील प्रादेशिक उपायुक्त, सहायक उपायुक्त उपस्थित होते.



श्री. शिरसाट म्हणाले, विभागाच्यावतीने विद्यार्थी घडविण्याचे फार मोठे काम करण्यात येते. विद्यार्थीच्या जीवनात आमूलाग्र बदल घडविण्यासाठी वसतिगृहाचे अनन्यसाधारण महत्व आहे. त्यामुळे राज्यात वसतिगृह उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना वसतिगृहामध्ये देण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रियेमध्ये बदल करुन त्यामध्ये कृत्रिम बुद्धिमतेचा वापर करण्यात यावा. विभागामध्ये चांगले काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देण्यात यावे. त्यांनीही विभागात आपल्या कामाच्या माध्यमातून वेगळी छाप निर्माण करावी, राज्याला दिशादर्शक होईल यादृष्टीने नवनवीन उपक्रम राबवावेत, या उपक्रमाचे इतरांनी अनुकरण करण्याची गरज आहे. अधिकारी-कर्मचाऱ्यांकरिता कार्यालयाच्याजवळ निवासस्थान उपलब्ध करण्यासोबतच सोसायटी स्थापन करण्याबाबत नियोजन करावे.
कार्यशाळा ही अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या विचारांची देवाण-घेवाण तसेच त्यांच्या अडीअडचणी मांडण्याची व्यासपीठ आहे, त्यामुळे या कार्यशाळेचा आनंद घेत विचाराची देवाण-घेवाण करावी. याठिकाणी झालेले निर्णय, चर्चेच्या अनुषंगाने विभागात प्रभावीपणे अंमलबजावणी करून आगामी सकारात्मक परिणाम दिसले पाहिजे.
राज्याच्या अर्थसंकल्पात विभागासाठी मंजूर झालेला निधी वेळेत खर्च होईल, यादृष्टीने काम करावे, असेही शिरसाट म्हणाले.
प्रधान सचिव डॉ. कांबळे म्हणाले, महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. विभागाच्यवतीने समाजातील विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, नागरिक आदी घटकांसाठी लोक कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करुन त्यांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडविण्यासाठी काम करावे. येत्या काळात शिक्षण, पायाभूत सुविधा, उद्योजकता, सामजिक सुरक्षा आणि तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर या पाच पैलूंवर काम करुन विभागाची धोरण ठरविण्यात येणार आहे, त्यामुळे विभागाने विकसित महाराष्ट्र २०२७ चा दृष्टिकोन समोर ठेवून प्रभावीपणे काम करावे, असेही डॉ. कांबळे म्हणाले.श्रीमती मुधोळ-मुंडे म्हणाल्या, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागावतीने येत्या काळात नवनवीन धोरणे, योजना राबविण्याचा मानस आहे. केंद्र सरकारच्या 'आय-गॉट' संकेतस्थळाच्या माध्यमातून अधिकारी-कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले. अधिकारी-कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा या वर्षी प्रथमच आयोजित करण्यात आल्या, त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ऊसतोड कामगार, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि तृतीयपंथीयांच्या कल्याकरिता काम करण्याचे नियोजन करण्यात आले आहे, या कार्यशाळेचा विभागाला निश्चित उपयोग होईल, असेही श्रीमती मुधोळ-मुंडे म्हणाल्या.यावेळी दिवसभर विविध योजनांच्या संदर्भात प्रादेशिक उपायुक्त व सहाय्यक आयुक्त यांनी सादरीकरण केले.कार्यशाळेचे सूत्रसंचालन व आभार बार्टीचे विभागप्रमुख डॉ. बबन जोगदंड यांनी केले.

# सरकारला शेतकऱ्यांबद्दल आस्था उरली नाही का?

## भ्रष्टाचाऱ्यांना वाचवण्यासाठी जनतेने कौल दिलेला नाही पुण्याची कायदा-सुव्यवस्था रामभरोसे-सुप्रिया सुळे

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई (वृत्तसंस्था)**

सुप्रिया सुळे यांनी राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आणि पुण्यातील बिघडलेल्या कायदा-सुव्यवस्थेवर राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. महाराष्ट्रात अवकाळी पावसामुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडले असून, सरकारने दिलेला सरसकट कर्जमाफीचा शब्द अद्याप पूर्ण झालेला नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.पुण्यात पत्रकारांशी संवाद साधताना त्या म्हणाल्या की, राज्यातील कोणत्याही भागात गेलात तरी शेतकऱ्यांचे हाल दिसून येतात. कांदा, दूध आणि शेतीमालाला योग्य भाव मिळत नाही. युरियाचा तुटवडा जाणवत आहे, डिझेल सहज उपलब्ध होत नाही. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. सरकारला शेतकऱ्यांबद्दल खरंच काही आस्था उरली आहे का, असा प्रश्न पडतो.राज्य सरकारने मोठमोठ्या घोषणा केल्या, मात्र प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या हातात काहीच पडत नसल्याचा आरोपही त्यांनी केला. राज्याच्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीच्या घोषणा करण्यात आल्या होत्या. पुण्यातील कायदा आणि सुव्यवस्था गेल्या काही वर्षांपासून ढासळत असल्याचा आरोप करत सुळे म्हणाल्या की, मी गेली तीन-चार वर्षे सातत्याने सरकारचे लक्ष वेधत आहे. महिला आणि नागरिकांची सुरक्षा ही सरकारची नैतिक जबाबदारी आहे. मात्र सरकार याकडे गांभीर्याने पाहताना दिसत नाही.यावेळी त्यांनी राज्यातील वाढत्या भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरही सरकारला धारेवर धरले. परीक्षांमधील गोंधळ आणि भ्रष्टाचार वाढत चालला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी भ्रष्टाचारमुक्त भारताची घोषणा करतात, पण प्रत्यक्षात अनेक घोटाळे समोर येत आहेत. भ्रष्टाचाऱ्यांना वाचवण्यासाठी महाराष्ट्राच्या जनतेने महायुतीला जनादेश दिलेला नाही, असा घणाघात त्यांनी केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरही कठोर भूमिका घ्यावी, अशी मागणी करताना त्या म्हणाल्या, नाशिकच्या खरात प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी घेतलेल्या भूमिकेचे आम्ही विरोधक असूनही स्वागत केले. त्याच धर्तीवर भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्येही त्यांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता कठोर कारवाई करावी.

राज्यातील कायदा-सुव्यवस्था, शेतकरी संकट आणि भ्रष्टाचाराच्या मुद्द्यांवरून सुळे यांनी सरकारवर केलेल्या टीकेमुळे राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापण्याची चिन्हे दिसत आहेत.



## आधीच उन्हाळ्यात विज बिल वाढले त्यात अतिरिक्त सुरक्षा ठेवीचा बोजा

### पारा ४३ वर पोहोचला : एप्रिल मध्ये होर्फ आता खिशाला झळ

**दैनिक वादळ वार्ता**
**देगलूर । प्रतिनिधी**

आधीच उन्हाळ्यामुळे वीज वापर वाढून बिल वाढले असताना, ग्राहकांना महावितरण कडून अतिरिक्त सुरक्षा ठेव भरण्याच्या नोटिसा पाठविण्यात येत आहेत. ग्राहकांच्या वीज वापरात वाढ झाल्यास संभाव्य थकबाकीचा धोका लक्षात घेऊन अतिरिक्त सुरक्षा ठेव आकारली जाते. देगलूर तालुक्यातील वीज ग्राहकांना एप्रिल महिन्याच्या वीज बिलासोबत अतिरिक्त सुरक्षा ठेव भरण्यासाठी स्वतंत्र दिले आहेत. त्यामुळे ग्राहकावर या महिन्यात आर्थिक भार वाढणार आहे.

**वीज वापराआधारे सुरक्षा ठेव**

ग्राहकांच्या मागील एका वर्षातील सरासरी वीज वापराच्या आधारे अतिरिक्त सुरक्षा ठेवीची रक्कम निश्चित करण्यात येते. त्यानुसार ग्राहकांना हजारात तर कोणाला ५० रुपये पर्यंत सुरक्षा ठेवीची बिल मिळत आहे.

**दरवर्षी एप्रिल मध्ये आकारले जाते बिल**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या विद्युत पुरवठा संहिता २०२१ च्या विनियम १३. १ नुसार वीज ग्राहकाकडून सुरक्षा ठेवा करण्यात येते. दरवर्षी सुरक्षा ठेवीची पुनर्गना करण्यात येते. त्यानुसार आर्थिक वर्ष संपल्यानंतर एप्रिल मध्ये सुरक्षा ठेवीची वीज बिल आकारले जाते.

**अशी आहे तरतूद**

वीज ग्राहकांची सुरक्षा ठेव मासिक बिल असेल तर तेथे सरासरी मासिक बिलाच्या दुप्पट आणि त्रैमासिक असेल तेथे सरासरी त्रैमासिक बिलाच्या दीडपट घेण्याची तरतूद महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडून करण्यात आली आहे.

त्यातच महावितरणची अतिरिक्त सुरक्षा ठेव बिले विजेचा वापर वाढल्याने मिळणाऱ्या बिलातील रक्कम नेहमीपेक्षा जास्त लागणार आहे. यातच महावितरण कडून अतिरिक्त सुरक्षा ठेव बिले ग्राहकांना दिली जात आहे. विद्युत सुरक्षा ठेव समान सहा मासिक हप्त्यात भरण्याची ग्राहकांना सुविधा दिली जाते.

**वीज वापर वाढला**

तापमानाचा पारा एप्रिल पासून दिवसेंदिवस वाढत गेला आहे. मे सुरू झाल्यानंतर यात आणखी भर पडली उखाड्यापासून बचावासाठी पंखे, कुलर , एसीचा वीज वापर वाढला आहे.

**लघुदाब वीज ग्राहकांना घरबसल्याशिवाय**

लघुदाब वीज ग्राहकांना अतिरिक्त सुरक्षा ठेवीची रक्कम घरबसल्या भरण्यासाठी महावितरणच्या वेबसाईटवर व महावितरण मोबाईल पद्वारे उपलब्ध आहे २० ग्राहकांनी अतिरिक्त सुरक्षा ठेवीच्या बिलाची रक्कम भरून सहकार्य करावे असे आव्हान महावितरण करून करण्यात येत आहे

## प्रशासक राजवटीमुळे विकास कामे ठप्प;रोजगार हमी योजनेचा बट्ट्याबोळ

**दैनिक वादळ वार्ता**
**देगलूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील बावीस जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका ओबीसी आरक्षणासंदर्भातील न्यायालयीन व तांत्रिक अडचणीमुळे दीर्घ काळापासून रखडल्या आहेत. लोकशाहीचा कणा मानल्या जाणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था आज अस्तित्वाच्या संकटात सापडले आहेत. निवडणुका न झाल्याने सर्वत्र प्रशासक राजवट लागू असून पंचायत राज व्यवस्थेचे अक्षरशा:
खच्चीकरण होत असल्याची तीव्र भावना ग्रामीण भागातून व्यक्त होत आहे.

देगलूर तालुक्यात याचे गंभीर परिणाम स्पष्टपणे दिसून येत आहेत. मागील एक वर्षापासून महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना जवळपास ठप्प झाल्याचे चित्र आहे. मजुरांच्या हाताला काम नसल्याने रोजगारांच्या शोधात अनेक गावातील नागरिक स्थलांतर करत असून,



काही गावात अर्धे गाव खाली झाल्याचे वास्तव समोर येत आहे. पंचायत समितीवर गेल्या अनेक वर्षापासून प्रशासक म्हणून गटविकास अधिकाऱ्याकडे कारभार आहे. निवडून आलेले लोकप्रतिनिधी नसल्यामुळे सामान्य नागरिकांची व्यासपीठात उरले नाही. शेती, पाणी, रस्ते रोजगार अशा मूलभूत प्रश्नाकडे दुर्लक्ष होत असून विकास कामे पूर्णपणे ठप्प पडली आहेत. प्रशासकीय राजवटीत केवळ कागदोपत्री कामकाज सुरू असल्यास आरोप ग्रामस्थांकडून होत आहे. जनहिताच्या योजना प्रभावीपणे राबविल्या जात नसल्याने शासनाच्या उद्दिष्टांनाही तडा जात आहे. पंचायत समिती कार्यालयातील शिस्त ढासळली असून अधिकारी व कर्मचारी मनमानी करत असल्याची तक्रार आहे. अलीकडे काही दांडी ७२ व लेटलतीफ कर्मचाऱ्यांना नोटीसा देण्यात आल्या मात्र त्यावर ठोस कारवाई झाल्याचे दिसून येत नाही. देगलूर पंचायत समितीचे कार्यालय हे वरच्या मजल्यावर असून तहसील कार्यालयाच्या खालच्या मजल्यावर असूनही वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष असल्याची खंत व्यक्त होत आहे.

त्यामुळे प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून शिस्त प्रस्थापित करावी तसेच रखडलेल्या निवडणुका घेऊन लोकप्रतिनिधी मार्फत पुन्हा लोकशाही व्यवस्थेला बळ द्यावी अशी जोरदार मागणी देगलूर शहर व तालुक्यातील गोरगरीब नागरिकांतून होत आहे.

# उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशनच्या डी बी पथकाने केली कमाल!

**दैनिक वादळ वार्ता**
**उदगीर । प्रतिनिधी**

पोलीस प्रशासनातील कर्तबगार कर्मचाऱ्यांनी जर का मनावर घेतले, तर ते सुतावरून स्वर्ग गाठू शकतात. याचा प्रत्यय म्हणून उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशनच्या डी बी पथकाने केलेल्या कामाचा उल्लेख करता येईल. एप्रिल महिन्यामध्ये शहरा बाहेर असलेल्या वस्तीतील दोन घरे बंद असल्याचे पाहून चोरट्यांनी घरातील लोखंडी कपाटाच्या आत ठेवलेल्या सोन्या-चांदीच्या दागिन्यासह रोख रक्कम पळवली होती. या अनुषंगाने दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजी नारायण पुंडलिकराव बनसोडे (वय ६९ वर्ष राहणार तथागत नगर धन्वंतरी कॉलेज रोड उदगीर) यांनी पोलीस स्टेशन उदगीर ग्रामीण येथे तक्रार दिल्यावरून गुरन १७७ /२६ कलम ३३१ (४), ३०५ भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. तसेच दिनांक २७ एप्रिल रोजी कपिल दिलीप रेड्डी (वय ३५ वर्ष राहणार वायगाव तालुका उदगीर हाल मुक्काम साईधाम निडेबन तालुका उदगीर) यांचेही घर फोडले होते. त्या अनुषंगाने त्यांच्याही फिर्यादीवरून उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता. घरफोड्यांचे सत्र सुरू झाले की काय? अशी भीती शहरात वर्तवली जात होती. विशेष म्हणजे शहराच्या बाहेरील भागात राहणाऱ्या या वस्त्यांमध्ये एक दहशत निर्माण झाली होती. जनतेच्या संपत्ती आणि जीविताच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारलेल्या पोलीस यंत्रणेला हे जणू आव्हान होते. त्या अनुषंगाने जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण तसेच उदगीर उपविभागाचे पोलीस अधिकारी गजानन भातलवंडे या संदर्भामध्ये उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी जेष्ठ पोलीस निरीक्षक अशोक अनंत्रे यांना आवश्यक त्या सूचना केल्या होत्या. वरिष्ठांच्या सूचना आणि मार्गदर्शनानुसार ज्येष्ठ पोलीस निरीक्षक अशोक अनंत्रे यांनी आपल्या गुन्हे प्रकटीकरण शाखेतील कर्तबगार कर्मचाऱ्यांना या अनुषंगाने कामाला लावले होते.अत्यंत बारकाईने तपासणी करून घटनास्थळावरून फिंगरप्रिंट्स घेण्यात आल्या होत्या. अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर करत शोध मोहीम सुरू झाली होती. यामध्ये प्रामुख्याने गुन्हे प्रगटीकरण शाखेतील पोलीस उपनिरीक्षक कुलकर्णी तसेच पोलीस हवालदार राम बनसोडे, नामदेव चेवले, राजकुमार डबेटवार, सचिन नाडागुडे, फारुख शेख, सायबर सेलचे शैलेश सुडे यांच्या पथकाने बारकाईने निरीक्षण करून गुन्ह्याच्या ठिकाणी आढळून आलेल्या फिंगरप्रिंटच्या आधारे तसेच गुन्हा करण्याच्या पद्धतीचा अभ्यास करून अशा पद्धतीच्या गुन्ह्याची सवय असलेले आरोपी शोधण्याची मोहीम हाती घेतली.

गोपनीय बातमीदारांच्या मदतीने ही अधिक माहिती काढण्याचा प्रयत्न सुरू झाला. सदरील गुन्ह्यामध्ये पोलिसांच्या रेकॉर्डवर असलेले चार आरोपी ज्यामध्ये प्रामुख्याने बळीराम विश्वनाथ कुसळकर (वय ५० वर्ष राहणार आंबे नगर सांगवी विमानतळ नांदेड तालुका जिल्हा नांदेड) आणि अनिल सिताराम चव्हाण (वय ३० वर्ष राहणार बाभुळगाव कारखाना वसमत तालुका जिल्हा हिंगोली), हनुमंत बाबू पवार (वय २५ वर्ष राहणार बोधडी खुर्द तालुका भोकर जिल्हा नांदेड) आणि पिराजी हरिश्चंद्र कुसळे (वय ५७ वर्ष राहणार बुजरुकवाडी, पोस्ट निटूर तालुका निलंगा जिल्हा लातूर)



यांचा शोध घेऊन त्यांच्याकडे अधिक विचारपूस केली असता त्यांनी गुन्हे केल्याची कबुली दिली.

या टोळीचा सूत्रधार असलेल्या बळीराम विश्वनाथ कुसळकर यांच्यासाठी या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने यवतमाळ, हिंगोली इथपासून त्याचा माग काढत राहिल्याने शेवटी आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने या पथकाने त्याच्या मुस्क्या आवळल्या. त्यानंतर इतर आरोपी जणू काही आपण फार कष्टकरी आहोत, असे दाखवत दगडफोड्या म्हणून काम करण्याचे नाटक करत रेनापुर तालुक्यातील एका खेड्यात राहत होते. त्याचाही शोध घेऊन या गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पथकाने त्यांनाही जेरबंद केले.आरोपीने कबुली दिल्यानंतर त्याच्याकडून चोरी केलेले उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गुरन १७७ /२६ कलम ३३१ (४ ),३०५ भारतीय न्याय संहिता या गुन्ह्यातील सोन्याचे दोन तोळ्याचे एक गंठण, सोन्याचे दीड तोळ्याचे मिनी गंठण, सोन्याची सहा ग्रॅमची अंगठी असे एकूण ४१ ग्रॅम सोने अंदाजे मुद्देमाल व गुन्ह्यात वापरलेला कटावणी व ऑटो (क्रमांक २४ इ ८०४४) असा मुद्देमाल तसेच गुन्हा क्रमांक २४० /२६ मधील चार ग्राम वजनाचे कानातील सोन्याचे सरपाळे किंमत १४००० रुपये, पाच ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी किंमत १६ हजार रुपये असे एकूण नऊ ग्रॅम सोने किंमत ३०००० रुपये तसेच इतर काही मुद्देमाल ही जप्त करण्यात आला. असा एकूण पाच तोळे सोन्याचे दागिने व ऑटो किंमत एक लाख ३३ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणांमध्ये अटक करण्यात आलेल्या आरोपी हा अट्टल गुन्हेगार असून त्यांनी चाकूर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये गुरन ३६१/२१, गुरंन १५३ /२६, चाकूर पोलीस स्टेशन हद्दीतील दोन घरफोड्या, पोलीस स्टेशन पालम जिल्हा परभणी येथील गुरन १८० /२६, तसेच पोलीस स्टेशन पोखरणा जिल्हा बिदर राज्य कर्नाटक येथील गुरन १७ /२६, १८ /२६, १९ /२६, २० /२६ अशा चार घरफोड्या केल्याचे कबूल केले. उदगीर ग्रामीण येथील दोन अशा एकूण नऊ घरफोडया केल्याचे या आरोपींनी कबूल केले आहे. या आरोपीकडून इतरही अनेक गुन्हे उघड होण्याची अपेक्षा उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने ठेवली आहे.सदरील मोहीम ही जिल्हा पोलीस अधीक्षक अमूल तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन भातलवंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ज्येष्ठ पोलीस निरीक्षक अशोक अनंत्रे यांनी दिलेल्या सूचना प्रमाणे पोलीस उपनिरीक्षक कुलकर्णी, पोलीस उपनिरीक्षक राष्ट्रपाल लोखंडे, पोलीस उपनिरीक्षक परशुराम देवकते, पोलीस उपनिरीक्षक नागेश मुंडे व गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोलीस हवालदार राम बनसोडे, नामदेव चेवले, राजकुमार डबेटवार, सचिन नाडागुडे, फारुख शेख, मोमीन, सायबर सेलचे शैलेश सुडे, पोलीस हेडकॉन्स्टेबल भिसे, शिंदे, युवराज जाधव, चालक लोखंडे इत्यादींनी विशेष प्रयत्न केले. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक कुलकर्णी व पोलीस हेडकॉन्स्टेबल भिसे हे करत आहेत. उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने मोठ्या कष्टाने हे आरोपी अटक करून नऊ गुन्हे उघड केल्याबद्दल त्यांचे कौतुक केले जात आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077